प्रेसनोट

## भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनची कामगिरी
## गुन्हयामध्ये ५ वर्षापासुन पाहिजे असलेला सराईत आरोपीस अटक

-----

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं १)३०३३/०७, पिटा कायदा क- ३,४,५, २) ३०५४/११ पिटा कायदा क-३,४,५,७ असे गुन्हे दाखल असलेले व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु रं नं ३०२८/२०१२ पिटा कायदा क-४ व ५ या गुन्हयामध्ये गेले ५ वर्ष दि-२०/०४/१२ पासुन पाहिजे असलेला सराईत गुन्हेगार नामे - अरविन्द वाघाराम भट ऊर्फ रवि मल्होत्रा वय २९ वर्ष रा. पिकॉक हॉटेल.माउली वार्शींग सेंटर वारजे माळवाडी पुणे, मुळगाव-मु.पो.बास.आकेली जि-पाली मारवाड राज्य-राजस्थान. हा मुंबई पुणे बायपास कात्रज वंडरसीटी कडे जाणा-या रोडच्यापुढे पुणे येथे आला आहे अशी माहीती पोलीस हवालदार असगरअली सैय्यद यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले,व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजकुमार वाघचवरे यांना कळविली असता त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार पोलीस उप.निरी- शिवदास गायकवाड,पो.हवा-सिध्देश्वर पळसे पो.ना.समीर बगसिराज, विश्वजीत गाडवे, सुळ कल्पेश बाबर यांना मदतीस घेवुन सापळा रचुन संशयितरित्या उभा असलेला दिसला त्यांस सोबतचे स्टॉफचे मदतीने कव्हर करुन जागेवरच पकडून ताब्यात घेतले.

सदर कामगिरी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजकुमार वाघचवरे यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उप.निरी- शिवदास गायकवाड,पोलीस हवालदार असगरअली सैय्यद, सिध्देश्वर पळसे पो.ना विश्वजीत गाडवे, समीर बगसिराज, योगेश सुळ, कल्पेश बाबर यांनी केलेली आहे.